दै. अंबरनाथ जनमत १६.८.२०२४

# रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ इंडस्ट्रीयल एरियातर्फे कळमपाडा शाळेतील मुलांना स्पर्धा परीक्षा पुस्तके वाटप

वासिंद: १५ ऑगस्ट रोजी वासिंद शहरापासून जवळच असलेल्या जि.प.शाळा कळमपाडा येथील विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ इंडस्ट्रीयल एरिया यांच्यातर्फे शिष्यवृत्ती परीक्षा, जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा मार्गदर्शिका यांचे वाटप करण्यात आले.सदर शाळा पूर्णपणे आदिवासी वस्तीची असून कष्टकरी पालकांची मुले इथे शिक्षण घेत आहेत.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाळेचे सहशिक्षक सुनिल परटोले यांनी शाळेच्या प्रगतीबाबत आतापर्यंतचा प्रवास उपस्थितांसमोर कथन केला.समाज सहभागातून व ग्रामस्थांच्या सहकार्यातून शाळा अतिशय सुंदर केली असून शाळेतील मुले दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा,जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा व इतर स्पर्धा परीक्षा यात सातत्याने यश मिळवत आहेत.त्यांचा या पुस्तक वाटपाने नक्कीच उत्साह वाढला असेल.

या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ इंडस्ट्रियल एरियाचे अध्यक्ष संदेश नामदे त्यांच्याच हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेचे कौतूक करून कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाबद्दल शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

रोटरी क्लबच्या कार्यविषयी माहिती दिली.यापुढे देखील तूम्हाला काही सहकार्य हवे असल्यास नक्कीच सांगा असे देखील आश्वासन त्यांनी दिले.विविध स्पर्धा परीक्षात यश मिळविणा-या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.शेवटी रोटरी क्लबच्या वतीने सर्व उपस्थितांना लाडू व चॉकलेटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष संदेश नामदे,उपाध्यक्ष कैलासजी, सचिव भूषण कोठेकर, प्रोजेक्ट चेयरमन मयूर कोठारी, माजी अध्यक्ष अय्यर सर तसेच ग्रामपंचायत सरपंच गुरुनाथ पारधी गावातील सदस्य, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश



झुगरे,अंगणवाडी सेविका सीमा डोंगरे शेरे येथील समाजसेवक सातिश जाधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेचे सहशिक्षक सुनिल परटोले यांनी केले तर शेवटी मुख्याध्यापक प्रकाश झुगरे यांनी सर्वांचे आभार मानले.